अहवाल दिनांक : 20/05/2022

## महाराष्ट्र शासन

### गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ]

गाव :- **शिरुर ( 555609 )** तालुका :- **शिरुर** जिल्हा :- **पुणे**

गट क्रमांक व उपविभाग : **20/22/23/प्लॉट/नंबर/287**

भू-धारणा पध्दती : **भोगवटादार वर्ग -1** शेताचे स्थानिक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. भोगवटादाराचे नाव क्षेत्र आकार पो.ख. फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|
| क्षेत्राचे एकक आर.चौ.मी<br>अकृषिक क्षेत्र<br>बिन शेती 37.46.00<br>आकारणी 0.00 | 6484 ॲमिनीटी . 7.00.00 ( 1233 )<br>~~[6485] [-अजिंक्य कन्स्ट्रक्शन-जयराम 30.46.00~~ ( 15208 )<br>6486 बालाजी शिक्षण प्रसारक मंडल मुंबई विश्वस्त संस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणीकृत संस्था मु. पो. जातेगांव बु/ता. शिरूर 30.46.00 ( 1 ) | कुळाचे नाव व खंड<br>इतर अधिकार<br>बोजा - बँक बोजा<br>दि.महानगर को.ऑप.बँक ली.मुंबई शाखा शिरूर र.रु 5000000/-( पन्नास लाख ) बालाजी शिक्षण प्रसारक मंडल पुरते.( 21767 ) ( 6020 )<br>इतर<br>दि. महानगर को.ऑप. बँक ली.मुंबई शाखा शिरूर तर्फे संपत गणपत ठूबे र.रु 10000000/- ( 16219 )<br>बोजा - बँक बोजा<br>दि. महानगर को.ऑप. बँक ली.मुंबई शाखा शिरूर तर्फे लक्ष्मण भास्करराव गाडगे र. रु. 35000000/- तीन कोटी पन्नास लाख फक्त दि. 4/04/2016 ( 20716 )<br>प्रलंबित फेरफार : नाही.<br>शेवटचा फेरफार क्रमांक : 24557 व दिनांक : 19/02/2021 |
| जुने फेरफार क्र. ( 1 )( 1233 )( 15208 )( 15522 )( 21767 )( 23572 )( 24557 ) | | सीमा आणि भुमापन चिन्हे : |

### गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ]

गाव :- **शिरुर ( 555609 )** तालुका :- **शिरुर** जिल्हा :- **पुणे**

गट क्रमांक व उपविभाग : **20/22/23/प्लॉट/नंबर/287**

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मिश्र पिकाखालील क्षेत्र | | | | | | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र | | | | | | |
| | | | | | | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र | | | | | | | | | |
| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | | | | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | स्वरूप | क्षेत्र | | |
| (१) | (२) | (३) | *४ | *५ | *६ | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) |
| | | | | | | | आर. चौ.मी | आर. चौ.मी | | आर. चौ.मी | आर. चौ.मी | | आर. चौ.मी | | |

सूचना :- सदरचे क्षेत्र अकृषक क्षेत्रामध्ये रुपांतरीत झाले असल्याने या क्षेत्रासाठी गाव नमुना न.१२ ची आवश्यकता नाही

"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."
दिनांक :- 20/05/2022
सांकेतिक क्रमांक :- 272500030304770900520221937

श्री. एस. टी. ...मुख
( नाव :- सरफराज तराब देशमुख )
तलाठी साझा :- शिरुर, जिल्हा पुणे
तलाठी - शिरुर, ...
ता. शिरुर, जि. पुणे

V.P.Mhajorele
मुख्याध्यापक
बालाजी विश्व विद्यालय
रामलिंग रोड, शिरूर

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

DA 028955

2 1 APR 2010

अ. क्र. ९२८९ दिनांक ........ रु. १००/-

नाव बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ

पत्ता जातेगाव बु. ता शिरुर जि. पुणे

हस्ते बी एम सातव

स्टॅम्प व्हेंडर/सुनिल बी. रांजणकर

ला. न-१२/१८ हवेली नं.७, पुणे - ४११ ०२

१७८९ / १२४ / २००५

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

-:: बक्षिसपत्र ::- (विनामोबदला)

हे बक्षीसपत्र आज दिनांक २१ माहे एप्रिल सन २०१० बुधवार ते दिवशी.........

बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ,
मुंबई विश्वस्त संस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणिकृत संस्था.
मु.पो. जातेगाव बुद्रुक, ता. शिरूर, जि. पुणे तर्फे
१. अध्यक्ष श्री सदाशिव बाबासाहेब पवार
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती
राहणार : सर्व्हे नं. ९, खराडी, पुणे ४११०१४
२. सचिव श्री सुरेश बाबासाहेब पवार
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
राहणार मु.पो. जातेगाव बुद्रुक, ता. शिरूर, जि. पुणे
(ज्यांच्या नावाचा उल्लेख यापुढे
बक्षीस घेणार (डोनी) असा केला आहे.) ------------------लिहून घेणार

व

श्री अजिंक्य फत्तेसिंग जगताप
वय - २८ वर्षे, धंदा - व्यापार व शेती
रा. शिक्रापूर, ता. शिरूर, जि. पुणे
(ज्यांच्या नावाचा उल्लेख यापुढे सदर
बक्षीस देणार (डोनार) असा केला आहे.) ------------------ लिहून देणार

बक्षीस देणार (डोनार) व बक्षीस घेणार (डोनी) या दोघात बक्षीसपत्र पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे ते असे.

ज्या अर्थी,

१. खालील परिशिष्ठ (अ) मध्ये वर्णन केलेल्या मौजे शिरुर ग्रामीण येथिल मिळकती १) गट नंबर २०/१/अ/२ पैकी क्षेत्र ०१ हे. ०० आर, २) गट नंबर २०/१/ब मधील क्षेत्र ०० हे. २० आर, ३) गट नंबर २२/२/अ/२ मधील क्षेत्र ०१ हे. ९० आर, ४) गट नंबर २३/१ क्षेत्र ०१ हे. ८१ आर, ५) गट नंबर २३/२ क्षेत्र ०१ हे. ८३ आर या जमीनीचे लिहून देणार हे कायदेशिर मालक असुन सरकार दफ्तरी ७/१२ चे उताऱ्यावर लिहून देणार यांचे नावाची नोंद झालेली आहे. सदर जमीनीचे विक्री अगर

विल्हेवाट करण्याचा लिहून देणार यांना संपुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असुन त्या खालिल परीशिष्ठ अ मध्ये स्पष्टपणे नमुद केलेल्या आहेत.

२. सदर जमीनीबाबत मा. सहाय्यक संचालक नगररचना पुणे यांचेकडे लेआऊट सादर केला. मा. सहाय्यक संचालक नगररचना पुणे यांचेकडील क्रमांक रेखांकन/एनएबीपी/मौजे शिरूर/ता.शिरूर/ग.न. २०, २२ व २३ पै./ससंपु/३५०५ दिनांक २२/०९/२००९ व मा. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडील आदेश क्र.पमअ/कावी/१३८६/०२ दिनांक ०५/१०/२००२ अन्वये मंजुर केला असुन मा. उपविभागीय अधिकारी मावळ, उपविभाग, पुणे यांचे कार्यालय क्रमांक/एनए/एसआर/१३६/२००९ दिनांक ०४/०१/२०१० अन्वये सदर मिळकतीमधील एकूण ६४,३८९.१८ चौ.मी. जागेवरील अकृषीक रेखांकन/बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

३. सबब लिहून देणार हे सदर जमीनींचे कायदेशीर मालक असल्याने तसेच सदर जमीनीवर मा.सहाय्यक संचालक नगररचना पुणे यांनी रेखांकन मंजुर केलेले असल्याने तसेच मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी बिनशेती वापराचा आदेश दिलेला असुन सदर मंजुर रेखांकनमध्ये वेगवेगळे प्लॉट्स/ तसेच ॲमीनीटी स्पेस म्हणून कॉलेज बिल्डींग करीता सर्व्हे नं. २३ मध्ये ३७४६ चौ.मी. ज़ागा निश्चित करण्यात आलेली आहे. सदर जागा खालिल परीशिष्ठ ब मध्ये स्पष्टपणे नमुद केली असुन सोबतचे नकाशात लाल रंगाने दर्शविलेली आहे. व तिचा यापुढे सदर मिळकत असा उल्लेख करण्यात आला आहे.

४. लिहून घेणार (डोनी) हि मुंबई विश्वस्त संस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणिकृत संस्था असुन सदर संस्थेचे उद्देश समाजातील सर्व घटकांना शैक्षणिक व तदअनुषंगीक सुविधा पुरविणे असे आहे.

५. लिहून देणार (डोनार) यांनी संपुर्ण मिळकत हि निवासी तसेच वाणिज्य प्रयोजनासाठी विकसीत करण्याचे ठरविले असल्याने व सदर मिळकत

विकसित झाल्यानंतर त्या ठिकाणी रहावयास येणाऱ्या तसेच आजुबाजुच्या परीसरातील विद्यार्थ्यासाठी तसेच शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक असल्याने तसेच सदर मिळकत कॉलेज बिल्डींगकरीता राखीव असल्याने त्या प्रयोजनाकरीता लिहून देणार यांनी बक्षिसपत्राने देण्याचे ठरविले तसेच सदर शैक्षणिक संस्था हि सर्व धर्मियांसाठी खुली राहील त्याची माहिती लिहून घेणार यांना झालेनंतर त्यांनी आपले व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०४/२०१० रोजीचे सभेमध्ये ठराव करून मंजुर रेखांकन मधील सदर कॉलेज बिल्डींग प्रयोजनाकरीता निश्चित असलेली सदर मिळकततिचे क्षेत्र ३७४६ चौ.मी. जागा लिहून घेणार (लेसी) यांचे सदर प्रयोजनाकरीता अत्यंत सोयीची असलेने लिहून घेणार (लेसी) यांनी बक्षिसपत्राने घेण्याचे ठरविले तसेच सदर शैक्षणिक संस्था हि सर्व धर्मियांसाठी खुली राहील व त्याकरीता व्यवस्थापन समितीचे उपरोक्त मिटींगमध्ये सदर बक्षिसपत्र घेण्याबाबत मंडळाचे अध्यक्ष श्री सदाशिव बाबासाहेब पवार व सेक्रेटरी श्री सुरेश बाबासाहेब पवार यांना आवश्यक ते सर्व अधिकार प्रदान केले.

६. तेव्हा सदर कारणास्तव व बक्षीस देणार व बक्षीस घेणार यांच्यात झालेल्या ठरावानुसार कोणताही मोबदला न घेता बक्षीस देणार यानी बक्षीसपत्राने त्याची सदर मिळकत (जिचे तपशिलवार वर्णन शेवटी परिशिष्ट ब मध्ये दिले आहे.) ती तदंगभूत सर्व स्थावर वस्तू, वहिवाटीचे हक्क यासह व बक्षीस देणार याचे सदर मिळकतीसंबंधी असलेले सर्व हक्क हितसंबंध यांसह बक्षीस घेणार यांना हस्तांतरित (दस्ता) व प्रदान करीत आहे व बक्षीस घेणार यांनी सदर मिळकतीचा यापुढे पूर्ण मालक म्हणून उपभोग घ्यावा व वहिवाट करावी. यापुढे बक्षीस देणार यांचा सदर मिळकतीवर कसलाही हक्क - हितसंबंध राहिला नाही. मात्र सदर मिळकतीसंबंधी जे सरकारी अगर निमसरकारी कर व तत्सम देणे असेल ते देण्याची बक्षीस घेणार यांच्यावर जबाबदारी राहील.

आणि या बक्षीसपत्राने बक्षीस देणार हे बक्षीस घेणार यांस खालीलप्रमाणे अभिवचन देत आहेत.

१. बक्षीस देणार हे सदर मिळकतीचे पूर्ण मालक असून, त्यांना हे बक्षीसपत्र करण्याचा हक्क आहे.

२. बक्षीस घेणार यांनी सदर मिळकतीचा कब्जा घेऊन तिचा पूर्ण मालक म्हणून उपभोग घ्यावा व वहिवाट करावी व सदर मिळकतीचे सर्व उत्पन्न वसूल करून त्याचा उपभोग घ्यावा. त्याला बक्षीस देणार व त्यांचे वाली - वारस कसलाही अडथळा अगर हरकत करणार नाहीत व सदर मिळकतीवर कसलीही मागणी अगर दावा करणार नाहीत.

३. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आणि बोजारहित असल्याची व सदर मिळकत खरेदी देणेचा खरेदी देणार यांस हक्क अधिकार असल्यांची खात्री व भरवंसा खरेदी देणार देत आहेत. तसेच सदर मिळकतीमध्ये कोणाचा खरेदी गहाण, दान, बक्षिस, लिज, करारसाठेखत, अदलाबदल, विसारपावती, कुळखंड, पोटगी, वारसा वगैरे कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध अधिकार बोजा नसल्याची खात्री व भरवंसा लिहून देणार, देत आहे, सदर मिळकतींबाबत लिहून देणार यांनी कोणाशीही लेखी अगर तोंडी करार केलेला नाही अगर जडजोखमीत गुंतवलेली नाही व सदर शेतजमीन कोणतेंही कोर्टात वादाचा विषय नाही, तसेच सदर मिळकत अगर तिचा भाग कोणतेही कारणास्तव संपादित करणेत असलेला नसून त्याबाबतचे नोटीस खरेदी देणारांस असलेल्या नाहीत. अशी संपूर्ण निर्वेध व निजोखमी व बोजारहित मिळकत तुम्हास प्रस्तुत दस्ताने आम्ही बक्षीस दिली आहे. आता वर नमूद केलेल्या मिळकतींचे तुम्ही कायदेशीर मालक झाला असून सदर मिळकत लिहून देणार यांचा अगर यांचे वालीवारसांचा कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध व अधिकार राहिलेला नाही.

४. सदर मिळकतीचे आजपावेतोचे सर्व सरकारी, निमसरकारी कर पट्टी, आकारणी साऱ्याची रक्कम वगैरे खरेदी देणार यांनी भरलेली आहे. येथून पुढील सर्व कर लिहून घेणार यांनी भरणेची आहेत. यदाकदाचित मागील कराची बाकी निघाल्यास लिहून देणार भरतील. त्याची तोषिस खरेदी घेणारांस लागू देणार नाही.

५. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीत प्रस्तुतचे दस्ताने लिहून घेणारांस बक्षीस दिलेल्या जमिनींबाबत सरकार दप्तरी ७/१२ आणि रेव्हेन्यु रेकॉर्डला खरेदी घेणार यांची नांवाची नोंद कब्जेदार, मालक व वहिवाटदार म्हणून करून घ्यावी, त्याबाबत लिहून देणार यांची अथवा इतर आवश्यक लोकांची सही संमतीची आवश्यकता भासल्यास अथवा समक्ष हजर राहून जाबजबाब देणे लागल्यास ते लिहून देणार , विनामोबदला हयगय न करता मिळवून देवू.

६. सदर बक्षीसपत्रान्वये लिहून घेणार हे मालक झाले असून सदर मिळकतीचा वंशपरंपरेने निरंतर मालकी हक्काने पुत्रपौत्रादी उपभोग घ्यावा व तुम्हांस योग्य वाटेल तशी वहिवाट, विल्हेवाट करावी. तुमचे वहिवाटीस/विल्हेवाटीस कोणी वाली वारस, सावसावकार यांनी हिल्ला हरकत केल्यास आणि वाद निर्माण केल्या त्याचे निवारण लिहून देणार यांचे स्वतःचे खर्चाने करतील त्याची तोषिस खरेदी घेणारांस लागू देणार नाही.

७. सदर मिळकतीवर गहाण वगैरे कसलाही बोजा नाही व तसा आढळून आल्यास त्याचे निरसन बक्षीस देणार स्वखर्चाने करून देतील व त्यासंबंधी बक्षीस घेणार यांना कसलीही तोशीस लागू देणार नाही.

८. सदर मिळकतीचे बक्षीस घेणार यांना पूर्ण स्वामित्व मिळावे म्हणून आणखी काही दस्तखते अगर करार करणे आवश्यक आहे असे आढळून आल्यास तशी दस्तखते अगर कागदपत्रे बक्षीस देणार करून देतील.

९. येणेप्रमाणे बक्षीस देणार यांनी हे बक्षीसखत करुन दिले आहे व त्याची साक्ष म्हणून खाली सही केली आहे.

परिशिष्ठ (अ)

मिळकतीचे वर्णन : तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका शिरूर, मा. दुय्यम निबंधक शिरूर यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे तालुका पंचायत समिती शिरूर, ग्रामपंचायत शिरूर यांचे स्थलसिमेतील गांव मौजे शिरूर येथील मिळकती :-

(१) शेतजमिन गट नं. -२०/१/अ/२ क्षेत्र ०३ हेक्टर ३८ आर यांसी आकार ०१ रू.२२ पैसे पैकी पूर्वेकडील लिहून देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०१ हेक्टर ०० आर, यांसी आकार रू.००-३६पै. यांसी चतुःसिमा :

पूर्वेस : ग. नं २२/२अ/२,२२/२अ/१.
दक्षिणेस : बगाड रस्ता
पश्चिमेस : ग.नं.२०/१अ/२पै.शिल्लक जमीन
उत्तरेस : गट नं. २०/१ब

(२) शेतजमिन गट नं. - २०/१/ब क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर यांसी आकार ०० रू. ७४ पैसे पैकी लिहून देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०० हेक्टर २० आर, यांसी आकार रू.००-०७पै. यांसी चतुःसिमा :

पूर्वेस : गट नं. २०/२अ/२
दक्षिणेस : गट नं. २०/१अ/१ व गट नं. २०/१अ/२
पश्चिमेस : गट नं. २०/२
उत्तरेस : शिरूर पाबळ रस्ता.

(३) शेतजमिन गट नं. - २२/२/अ/२ क्षेत्र ०२ हेक्टर ४९ आर यांसी आकार ०२ रू.०० पैसे पैकी पश्चिमेकडील दक्षिण कोपऱ्यातील लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०१ हेक्टर ८९ आर अ पो.ख. ०० हेक्टर ०१ आर असे एकूण ०१ हेक्टर ९० आर, यांसी आकार रू.०१-३१पै. यांसी चतुःसिमा :

पूर्वेस : २२/२अ/२ पैकी भोसले,ग.नं.२३
दक्षिणेस : गट नं.२२/२अ/१
पश्चिमेस : गट नं. २०

७६२ / ८१२४

२०१५

उत्तरेस : शिरूर पाबळ रस्ता.

(४) शेतजमिन गट नं. २३/१ क्षेत्र ०१ हेक्टर ७५ आर अधिक पो. ख. ०० हे. ०६ आर एकूण क्षेत्र ०१ हे. ८१ आर यांसी आकार ०१ रू.२५ पैसे, यांसी चतुःसिमा :

पूर्वेस : गट नं.२४

दक्षिणेस : रस्ता.

पश्चिमेस : गट नं. २३/२

उत्तरेस : गट नं.२१

(५) जिरायत शेतजमिन गट नं. - २३/२ क्षेत्र ०१ हेक्टर ८० आर अधिक पो. ख ०० हेक्टर ०३ आर एकूण क्षेत्र ०१ हे. ८३ आर आकार ०१ रू. २५ पै. यांसी चतुःसिमा :

पूर्वेस : २३/१

दक्षिणेस : रस्ता.

पश्चिमेस : २०

उत्तरेस : गट नं.२१.

## परिशिष्ठ (ब)

## प्रस्तुत बक्षिसपत्राचा विषय असलेली मिळकत

वर कलम (१) (अ) मध्ये वर्णन केलेल्या मौजे शिरूर येथील मिळकती गट नं. -२०/१/अ/२, गट नं. - २०/१/ब, गट नं. - २२/२/अ/२, गट नं. २३/१, गट नं. - २३/२ मंजुर रेखांकनमधील मधील कॉलेज बिल्डींग प्रयोजनाकरीता निश्चित असलेली सदर मिळकत तिचे क्षेत्र ३७४६ चौ.मी. सोबताचे नकाशात लाल रंगाने दर्शविलेली आहे यासी चतुःसिमा खालीलप्रमाणे.....

पूर्वेस : १५ मीटर डि.पी. रस्ता

दक्षिणेस : प्लॉट नं. १,३,४ व ६

पश्चिमेस : १२ मीटर रस्ता

उत्तरेस : गट नं. २१, पाबळ रस्ता

येणेप्रमाणे मजकुराचा [illegible] दस्त लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना लिहून दिला असुन अक्कहुशारीने आज रोजी [illegible] दोन्ही पक्षकारांनी त्यावर आपआपल्या सह्या साक्षीदारांसमक्ष केल्या आहेत व सदरचा दस्त लिहून देणार (मुळ मालक) यांचे वालीवारसांवर बधनकारक आहे व राहील.

साक्षीदार ::
१) सही
नांव श्री. काळे हनुमंत बापूसो
पत्ता रा. निमगाव म्हाळुंगी, ता. शिरुर, जि. पुणे.

श्री अजिंक्य फत्तेसिंग जगताप
(लिहून देणार)

साक्षीदार ::
२) सही
नांव सातव बापूसो मारुती
पत्ता रा. वाघोली, ता. हवेली जि. पुणे.

१. श्री सदाशिव बाबासाहेब पवार
अध्यक्ष

२. श्री सुरेश बाबासाहेब पवार
सचिव
बालाजी शिक्षण प्रसारक
मंडळाकरीता लिहून घेणार नं. १ व २

गाव नमुना सात

अधिकार अभिलेख पत्रक

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम , १९७१ यातील नियम ३, ५, ६ आणि ७]

तालुका : शिरुर जिल्हा : पुणे

| भूमापन क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पद्धती | भोगवटादाराचे नाव | | खाते क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | भोगवटादार वर्ग -१ | | | |
| स्थानिक नाव | | क्षेत्र आकार आणे पै पो.ख. फ.फा. | | |
| लागवडी योग्य क्षेत्र हे.आर.चौ.मी. 3.38.00 | | ज्ञानदेव धोंडिबा दसगुडे<br>बाळासाहेब धोंडिबा दसगुडे<br>अविभक्त फत्तेसिंग जगताप १.००.०० .३६ | (१५३४)<br>(१५३४)<br>(१४४७) | ११६७,४३४८<br>कुळाचे नाव |
| 3.38.00 | | | | इतर (३०६२) इतर (३८६१) (६०१७) इतर (१०९७८) पतसंस्था संपदा नागरी सह.पत शिरुर रु.१५०००००/- बाळासाहेब पु. (११६९९ इतर (१३३५४) इतर (१४४७९) |
| पोट खराबा लागवडी अयोग्य | | | | |
| अ) | | | | |
| ब) | | | | |
| आकारणी १.२२ | | (१),(४७९),(८०२),(८३०१) | | सीमा आणि भूमापन चिन्हे |

गाव नमुना बारा

पिकांची नोंदवही

[महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम , १९७१ यातील नियम २९]

| हंगाम | पिकाखालील क्षेत्रांचा तपशील | | | | | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मिश्र पिका खालील क्षेत्र | | | | | | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र | | | | | | |
| | मिश्रणाचा संकेत क्रमांक | | | घटक पिके व प्रत्येका खालील क्षेत्र | | | | | | | | | |
| | जल सिंचित | अजल सिंचित | | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | स्वरुप | क्षेत्र | | |

प्रमाणपत्र तयार तारीख 23/3/12

प्रत दिल्याची तारीख ⊗

फी घेतल्याची तारीख

स्टॅम्प फी शुल्क 95/-

कडबळ ०.२०.००

तहसिलदार शिरुर (पुणे)

Print Serial No 27250003030477000/2796